महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id: mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/९५४५
दिनांक : २७/०३/२०२१

# आदेश

विषय:- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश-लॉकडाऊन टप्प्याटप्प्याने उठविणे आणि या कालावधीत प्रतिबंधने कमी करणेबाबत (मिशन बिगिन अगेन). सुधारित आदेश

संदर्भ:-

१) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य-५, दिनांक १४ मार्च २०२०

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५

३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७

४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1 दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २३ ऑक्टोबर २०२०, ३ नोव्हेंबर२०२०, १४ नोव्हेंबर२०२०,२३ नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०, २१ डिसेंबर २०२०, २९ डिसेंबर२०२०, १४ जानेवारी २०२१, , १० फेब्रुवारी २०२१, १५ मार्च २०२१,१७ मार्च २०२१, २७ मार्च २०२१

५) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९२३, दि.३१.०७.२०२०,२९३४,दि.०३.०८.२०२०, ३७९१,दि.०२.०९.२०२०, ४६१५,दि.०१.१०.२०२०, ४८२३,दि.०९.१०.२०२०, ४८७४,दि.१३.१०.२०२०, ५१३५,दि.२१.१०.२०२०, ५१९६,दि.२४.१०.२०२०, ५३४२,दि.२९.१०.२०२०, ५३४५,दि.३१.१०.२०२०, ५४६७,दि.०५.११.२०२०, ५६४३,दि.१९.११.२०२०, ५९४७,दि.०१.१२.२०२०, ६६०८,दि.२२.१२.२०२०, ६८३८,दि.३१.१२.२०२०, ७१३९,दि.११.०१.२०२१, ७३५५,दि.१६.०१.२०२१, ७४५८,दि.२०.०१.२०२१, ७५४७,दि.२२.०१.२०२१, ७५७४,दि.२२.०१.२०२१, ७७८५,दि.०१.०२.२०२१, ८०२१, दि.०९.०२.२०२१,८२७४,दि.१८.०२.२०२१, ८३०८,दि.२१.०२.२०२१, ८५७७ दि.२८.०२.२०२१, ९०५२,दि.१२.०३.२०२१, ९१४४, दि.१६.०३.२०२१, ९३११, दि.२०.०३.२०२१, ९५३१ दि.२६/०३/२०२१

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ४ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठविणे ( मिशन बिगिन अगेन ) संदर्भात कोविड – १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

त्याअर्थी उपरोक्त संदर्भ क्र. ४ अन्वये सदर लॉकडाऊनचा कालावधी दि.१५/०४/२०२१ पर्यंत वाढविण्याबाबत आदेशीत केलेले आहे. तसेच लॉकडाऊन कालावधीत कोविड-१९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड-१९ या संसर्ग रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे महापालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

१) कोविड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निर्देश :-

- मुखपट्टी (मास्क) वापर करणे – सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी तसेच प्रवास करताना मुखपट्टी / फेसमास्कचा वापर करणे अनिवार्य आहे. मुखपट्टीचा वापर न केल्यास सदर व्यक्ती दंडनीय कार्यवाहीस पात्र राहील. उलंघन करणाऱ्या व्यक्तीस रक्कम रुपये ५००/- याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
- सामाजिक अंतर राखणे - सार्वजनिक ठिकाणी सर्व व्यक्तींनी किमान ६ फूटाचे सामाजिक अंतर राखले पाहिजे. दुकानांमध्ये येणाऱ्या ग्राहकांमध्ये सामाजीक अंतर (Social Distancing) राखेची जबाबदारी संबंधित दुकानदरांची राहील. तसेच दुकानदार, दुकानामध्ये एकावेळेस ५ पेक्षा जास्त व्यक्तींना प्रवेश देणार नाहीत.
- सार्वजनिक ठिकाणी थुंकणे हे संपूर्णतः प्रतिबंधित करण्यात येत आहे. उलंघन करणाऱ्या व्यक्तीस रक्कम रुपये १०००/- याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
- सार्वजनिक ठिकाणी पान, तंबाखू, गुटखा, धुम्रपान व मद्यपान करण्यास मनाई राहील.

२) कामाच्या ठिकाणाबाबत अतिरिक्त निर्देश

- घरातून काम करणे :- शक्य असेल तेथवर घरातून काम करण्याची पद्धत अनुसरण्यात यावी. कार्यालये, कामाचे ठिकाणी, दुकाने. बाजार पेठा आणि औद्योगिक व वाणिज्यिक अस्थापना यामध्ये कामाच्या / कामकाजाच्या वेळांची सुनियोजितपणे आखणी करावी.
- परीक्षण (Screening) व स्वास्थ्य – औष्णिक परीक्षण (थर्मल स्क्रीनिंग), हँड वॉश व सॅनिटायझर हे सर्व प्रवेशद्वारा जवळ व निर्गमनद्वारा जवळ आणि सामाजिक क्षेत्रात पुरविण्यात यावे.

➢ वारंवार निर्जंतुकीकरण (सॅनिटायझेशन) – संपूर्ण कामाचे ठिकाणाचे, सामाजिक सुविधांचे व मानवी संपर्कात येणाऱ्या सर्व जागा यांचे उदा.- दरवाजांच्या मुठी (डोअर हॅन्डल )इ. चे कामाच्या पाळयांमध्ये वारंवार निर्जंतुकीकरण (सॅनिटायझेशन) करण्याची सुनिश्चिती करण्यात यावी. \

➢ सामाजिक अंतर राखणे – कामाच्या ठिकाणच्या सर्व प्रभारी व्यक्ती, कामगारांचे पुरेसे अंतर राखणे, कामाच्या पाळयादरम्यान पर्याप्त अंतर ठेवणे, दुपारच्या जेवणाच्या वेळेत पुरेसे अंतर राखणे इ. द्वारे सामाजिक अंतर राखण्याची सुनिश्चिती करतील.

३) प्रतिबंधित क्षेत्र ( कंटेनमेंट झोन ) –

➢ कंटेनमेंट झोनबाबत मे.राज्य शासनाने दिलेल्या आदेशातील अटी व शर्ती पुढील आदेशांपर्यंत कायम राहतील.

➢ कंटेनमेंट झोन जाहीर करणे व त्याठिकाणी राबविण्यात येणाऱ्या उपाय योजना करिता केंद्र सरकार व राज्या सरकारने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / निर्देश यापुढे कायम राहतील

➢ प्रतिबंधित क्षेत्राबाबत पुणे महानगरपालिकेने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशातील सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

४) पुणे महानगरपालिका क्षेत्रात दिनांक २७ मार्च २०२१ चे मध्यरात्रीपासून रात्री ८:०० ते सकाळी ०७:०० यावेळेत ५ पेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. सदर आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीस प्रत्येकी रक्कम रुपये १०००/- याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

५) सर्व सार्वजनिक ठिकाणे रात्री ८.०० ते सकाळी ७.०० या वेळेत बंद राहतील. सदर आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीस प्रत्येकी रक्कम रुपये १०००/- याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

६) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व दुकाने (अत्यावश्यक वस्तू व सेवा जसे मेडिकल वगळून), हॉटेल, रेस्टोरंट, बार, फूडकोर्ट, सिनेमागृह ( Single Screen and Multiplex) नाट्यगृह / प्रेक्षागृह, इ. आस्थापना रात्री ८.०० ते सकाळी ७.०० या वेळेत बंद राहतील. तथापि, हॉटेलमार्फत पार्सल सेवा / घरपोच सेवा सुरु राहील. सदंर नियमांचा भंग झाल्यास मे. केंद्र शासन कोविड-१९ आपत्ती संपूर्णपणे संपली असे घोषित करेल त्या दिवसापर्यंत संबंधित आस्थापना बंद करण्यात येतील. तसेच आस्थापनांचे मालकाविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात येईल.

७) पुणे महानगरपालिका क्षेत्रात सर्व प्रकारचे सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, कार्यक्रम, सभा संमेलने यांस संपूर्णत: प्रतिबंध राहील. त्याच अनुषंगाने भूमी पूजन ,उदघाटन समारंभ व तत्सम मोठ्या संख्येने लोक एकत्र येऊ शकतील अशा प्रकारचे सर्व कार्यक्रमास संपूर्णत: प्रतिबंध राहील. नाट्यगृह / प्रेक्षागृह या ठिकाणी देखील सदर कार्यक्रम करणेस प्रतिबंध राहील. सदर नियमांचा भंग झाल्यास मे. केंद्र शासन कोविड-१९ आपत्ती संपूर्णपणे संपली असे

घोषित करेल त्या दिवसापर्यंत संबंधित आस्थापना बंद करण्यात येतील. तसेच आस्थापनांचे मालकाविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात येईल.

८) लग्न समारंभ कार्यक्रम जास्तीत जास्त ५० लोकांच्या उपस्थितीत करणेस परवानगी राहील. सदर नियमांचा भंग झाल्यास मे. केंद्र शासन कोविड-१९ आपत्ती संपूर्णपणे संपली असे घोषित करेल त्या दिवसापर्यंत संबंधित आस्थापना बंद करण्यात येतील. तसेच आस्थापनांचे मालकाविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात येईल.

९) अंत्यसंस्कार, दशक्रिया व त्यांच्याशी निगडीत कार्यक्रम जास्तीत जास्त २० लोकांच्या उपस्थितीत करणेस परवानगी राहील.

१०) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व उद्याने सकाळी ०७:०० ते १०:०० या वेळेत सुरु राहतील.

११) Home Isolation साठी खालील मार्गदर्शन सूचना/ अटींचे अवलोकन करावे.

- सहाय्यक आयुक्त, सनियंत्रण अधिकारी (Incident Commander) यांना Home Isolation बाबत नागरिकांनी संपूर्ण माहिती देणे बंधनकारक आहे. तसेच Home Isolation असताना घेण्यात येणाऱ्या वैद्यकीय उपचारांबाबत संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांना माहिती देणे आवश्यक आहे.
- सहाय्यक आयुक्त, सनियंत्रण अधिकारी (Incident Commander) यांनी कोविड पॉझिटिव्ह रुग्ण झाल्यापासून १४ दिवसांचा विलगीकरण कालावधी दर्शविणेबाबत फलक दरवाजावर अथवा दर्शनीभागावर लावणेबाबत कार्यवाही करावी.
- कोविड पॉझिटिव्ह रुग्णांच्या हातावर शिक्का मारणे बाबतची कार्यवाही सहाय्यक आयुक्त, सनियंत्रण अधिकारी (Incident Commander) यांनी करावी.
- कोविड पॉझिटिव्ह रुग्णांचे घरातील नातेवाईकांनी शक्यतो घराबाहेर पडू नये. आवश्यक असल्यास मास्क परिधान करून घराबाहेर पडावे.
- Home Isolation बाबत कोविड पॉझिटिव्ह रुग्णांकडून सदर नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास त्या प्रभागातील सहाय्यक आयुक्त, सनियंत्रण अधिकारी (Incident Commander) अशा रुग्णांना कोविड केअर सेंटर येथे त्वरित स्थलांतरित करणे बाबत कार्यवाही करतील.

१२) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व खाजगी कार्यालये (आरोग्य व अत्यावश्यक सेवा वगळून) ५०% मनुष्यबळासह सुरु ठेवता येतील. तसेच शासकीय / निमशासकीय कार्यालये बाबतीत त्यांचे कार्यालय प्रमुखांनी कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचे उपस्थिती बाबत निर्णय घ्यावा. मात्र त्यांनी कोविड-१९ संदर्भात मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. उत्पादन क्षेत्र संपूर्ण क्षमतेने सुरु ठेवता येतील. मात्र त्यांनी कामाच्या ठिकाणी सोशल डिस्टसिंग पाळले जाईल यानुसार कर्मचारी यांचे उपस्थितीचे नियोजन करावे. संबंधित आस्थापनांनी कामगारांकडून मास्कचा वापर व सामाजिक अंतर राखणे याबाबतच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणेच्या दृष्टीने वेगवेगळया शिफ्टमध्ये (सकाळ, दुपार, रात्र पाळी) कामाचे नियोजन करावे.

वरील आस्थापनांनी खालील मार्गदर्शन सूचना / अटींचे पालन करणे बंधनकारक राहील.-

- नागरिकांना / कर्मचाऱ्यांना विना मास्क प्रवेश देण्यात येवू नये.
- प्रवेशद्वारावर Thermometer, Thermal Scanner / Gun, Pulse Oxymeter द्वारे तपासणी करण्यात यावी.
- कोविड-१९ संदर्भात लक्षणे नसलेल्या नागरिकांना / कर्मचाऱ्यांना प्रवेश देण्यात यावा. ताप, सर्दी, खोकला यासारखी लक्षणे असलेल्या नागरिकांना / कर्मचाऱ्यांना प्रवेश देऊ नये.
- संबंधित आस्थापना चालकांनी नागरिकांसाठी / कर्मचाऱ्यांसाठी हॅन्ड सॅनिटाईजर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.
- नागरिकांकडून/ कर्मचाऱ्यांकडून मास्कचा वापर व सामाजिक अंतर पाळणे याबाबतच्या नियमांचे काटेकोरपणे पालन होते किंवा कसे याबाबत नियंत्रणाकरिता संबंधित आस्थापनांनी पुरेसे कर्मचारी नियुक्त करावेत.
- सदर नियमांचा भंग झाल्यास मे. केंद्र शासन कोविड-१९ आपत्ती संपूर्णपणे संपली असे जाहीर करत नाही तोपर्यंत संबंधित आस्थापना बंद करण्यात येतील. तसेच आस्थापनांचे मालकाविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात येईल.

१३) शासकीय कार्यालातील गर्दी टाळण्यासाठी सर्व शासकीय कार्यालयात नागरिकांना (निर्वाचित सदस्य, पदाधिकारी वगळून) अत्यावश्यक काम वगळता कार्यालयात येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. तथापि, बैठकी करीता निमंत्रित केलेल्या नागरिकांना संबंधित विभाग / कार्यालय प्रमुख यांनी प्रवेश पत्र देण्याची व्यवस्था करावी.

१४) सर्व धार्मिक स्थळांच्या ठिकाणी सामाजिक अंतर तसेच तेथील जागेची उपलब्धता पाहून सामाजिक अंतर पाळण्याच्या अनुषंगाने किती नागरिकांना प्रवेश देता येईल याची निश्चिती व्यवस्थापन / ट्रस्ट यांनी करावी. आणि जरुरतर ऑनलाईन पासची व्यवस्था करण्यात यावी.

१५) सार्वजिक वाहतूक व्यवस्था (पीएमपीएमएल) ५० % क्षमतेने सुरु राहील. सदर नियमांचा भंग झाल्यास रक्कम रुपये ५००/- प्रमाणे दंडात्मक कारवाई करावी.

१६) संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

१७) पुणे महानगरपालिकेने यापूर्वी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि. २७.०३.२०२१ पासून पुढील आदेशापर्यंत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि.२७.०३.२०२१ रोजी दिलेला आहे.

स्वाक्षरी / XXX

( विक्रम कुमार )

महापालिका आयुक्त

पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

निर्गमित

(सुनिल इंदलकर)

उपआयुक्त (सा.प्र)

पुणे महानगरपालिका